दिनांक-०५/०८/२०२६

**-: प्रेस नोट:-**

**''खुनासारख्या गंभीर गुन्ह्यातील मागील नऊ वर्षापासून वांटेड असलेल्या आरोपीतास कर्नाटक व गोवा राज्यात शोध घेऊन अटक केले बाबत ''.....**

एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक-०३/०२/२०१७ रोजी फिर्यादी श्री.अब्दुल मोहसीन शेख, वय-३५ वर्षे, व्यवसाय- चहा विक्री, राहणार-सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई यांना दिनांक-०३/०२/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास त्यांचा भाऊ वसीउल्ला मोहसीन शेख, वय-४१ वर्षे व नातेवाईक श्री. समशुद्दीन शेख, वय-३२ वर्षे यांना त्यांचा परिचयाचा चिन्का नावाच्या इसमाने फोन करून भेटण्याच्या बहाण्याने भंगारवाडी, सुभाषनगर,एम.आय.डी.सी अंधेरी (पुर्व), मुंबई येथे बोलाविले होते. तेथे एका भंगार गाळयात त्यांना जेवणासाठी म्हणून नेले त्या ठिकाणी सोहबराव यांची वसीउल्ला यांने पोलीसांना खबर दिली यांचा राग मनात धरून आरोपीत इसम नामे (१) मोहबतअली उर्फ चिंन्का (२) सोहराब (३) फिरोज (४) साबीर अली व दोन अनोळखी इसम यांनी आपसात अन्यायाने संगणमत करून,फिर्यादीना व त्याचे नातेवाईक (१) वसीउल्ला मोहसिन शेख, वय-४१ वर्षे, (२) श्री समशुद्दीन शेख, वय-३२ वर्षे यांना घेराव घालून लोखंडी सळई व लोखंडी पाईपने जबर मारहाण करून, हातापायाची व शरीराची हाडे मोडून गंभीर दुखापत केली. तसेच फिर्यादी यांचा भाऊ नामे वसीउल्ला मोहसिन शेख, वय- ३२ वर्षे यास जिवे ठार मारले म्हणून एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक-४८/२०१७, कलम ३०२, ३०७, ३२६, ३४२, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ५०६, १२०(ब) भादवी अन्वये नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयात सहभागी असलेले एकुण ६ आरोपीताना गुन्हा घडल्यांनतर तात्काळ अटक करण्यातआली होती. तर गुन्हयातील पाहिजे आरोपीत इसम नामे मेहताब आलम अझिमतुल्ला खान याचा सर्वोत्परी शोध घेवून देखील मिळून न आल्यामुळे त्यांची पोलीस ठाणे,अभिलेखावर पाहिजे आरोपी रजिस्टर मध्ये नोंद घेवून, नमुद गुन्हयातील अटक आरोपी याचे विरूध्द मा. सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई याचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदरचा गुन्हा सध्या न्यायप्रविष्ट आहे.

एमआयडीसी पोलीस ठाणे, येथील निगराणी पथकाचे अधिकारी सपोनि प्रविण राक्षे व पथक यांनी पाहिजे आरोपीत इसम नामे मेहताब आलम अझिमतुल्ला खान याचेबाबत गुप्त बातमीदार यांच्यामार्फतीने माहिती प्राप्त केली असता नमूद आरोपीत हा स्क्रॅपचे काम करत असून त्या निमत्ताने मागील नऊ वर्षापासून स्वत:चे अस्तित्व लपून भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये राहावयास असल्याबाबतची माहिती प्राप्त झाली .

सदर आरोपीताबाबतची माहिती सोशल मीडिया, इंस्टाग्राम व फेसबुक तसेच इंडिया मार्ट या माध्यमातून प्राप्त करून तसेच त्याचे मित्र व नातेवाईक याचे कडून मिळालेल्या माहितीचा सहानिशा करून, सदर माहितीचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले असता, पाहिजे आरोपीत इसम नामे मेहताब आलम अझिमतुल्ला खान, वय-४६ वर्षे हा सध्या कर्नाटक व गोवा या राज्यामध्ये वास्तव्यास असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक-०२/०८/२०२६ रोजी निगराणी पथक हे कर्नाटक व गोवा राज्यामध्ये सलग दोन दिवस नमुद पाहिजे आरोपीत इसमाचा कर्नाटक व गोवा राज्यामध्ये पाठलाग केला. त्यानंतर दिनांक-०३/०८/२०२६ रोजी पाहिजे आरोपीत इसम नामे मेहताब आलम अझिमतुल्लाह खान, वय-४६ वर्षे हा राष्ट्रीय ध्रुवीय एंव समुद्री अनुसंधान केंद्र, वास्को, गोवा या ठिकाणी स्क्रॅप उचलण्यासाठी जात असल्याचे माहिती प्राप्त झाली. त्यावर नमुद ठिकाणी जावून पाळत ठेवून स्थानिक पोलीस ठाणे यांच्या मदतीने नमुद आरोपीतास ताब्यात घेवून, त्यांच्याकडे नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशीकरून, सदर गुन्हयाच्या पुढील तपासकामी एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई येथे आणून, त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री देवेन भारती सो, पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री. मनोजकुमार शर्मा सो, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग डॉ.श्री. अभिनव देशमुख सो, मा. पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ-०३, मुंबई श्री. दत्ता नलावडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, अंधेरी विभाग, मुंबई श्री. योगेश शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. घनश्याम नायर, पो.नि. श्री. सुनिल कारंडे (गुन्हे), निगराणी पथकाचे अधिकारी सहा.पो.नि. प्रविण राक्षे, पो.ह. नारायण भोसले, पो.ह. विशाल पिसाळ (तांत्रिक मदत), पो.शि.तानाजी सुर्यवंशी, पो.शि. दिपक वाघमारे यांनी पार पाडली आहे.